## 2. डॉ.एम.एन.श्रीनिवास :

- **प्रस्तावना :**

संरचनात्मक प्रकार्यात्मक दृष्टीकोनातून भारतीय समाजाचा अभ्यास अनेक समाजशास्त्रज्ञांनी केला आहे.त्यापैकी डॉ.एम.एन.श्रीनिवास हे एक प्रमुख समाजशास्त्रज्ञ आहेत. डॉ.एम.एन.श्रीनिवास हे भारतातील अग्रगण्य समाजशास्त्रज्ञ व मानवशास्त्रज्ञ आहेत.त्यांनी भारतातील धर्म,जातीव्यवस्था,सामाजिक परिवर्तन,ग्रामीण समाज याचा संरचनात्मक प्रकार्यात्मक दृष्टीकोनातून अभ्यास केलेला आहे.

- **जीवनपरिचय :**

डॉ.एम.एन.श्रीनिवास यांचे संपूर्ण नाव **म्हैसूर नरसिंहाचार्य श्रीनिवास** असे आहे.त्यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९१६ मध्ये म्हैसूर याठिकाणी झाला.पदवी व पदव्युत्तर शिक्षण त्यांनी डॉ.जी.एस.घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.मुंबई विद्यापीठातून त्यांनी एम.ए.,एल एल.बी आणि पीएच.डी.पदवी प्राप्त केली.ऑक्सफर्ड विद्यापीठातून त्यांनी डी.फील पदवी प्राप्त केली.त्यांना संशोधन कार्यात **रेडक्लिप ब्राऊन** यांचे मार्गदर्शन मिळाले.शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठ(१९४८ -१९५१),बडोदा विद्यापीठ (१९५२-१९५९) व १९५९ ते १९७२ या कालावधीत दिल्ली विद्यापीठात समाजशास्त्र विभाग प्रमुख म्हणून काम पाहिले.

आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध विद्वान,क्रियाशील संशोधक म्हणून त्यांना ओळखले जाते,अंत्यंत प्रतिष्ठेची समजली जाणारी **“होमी भाभा सिनीअर फेलोशिप”** मिळवणारे ते पहिले भारतीय समाजशास्त्रज्ञ आहेत.आपल्या संशोधनातून व अध्ययनातून डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी भारतीय समाजशास्त्रात महत्वपूर्ण स्थान निर्माण केलेले आहे.भारतीय खेड्यांचा अभ्यास,जातीनिष्ठ समाजरचना,प्रभावी जात,सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन या घटकांवर त्यांनी संशोधन केलेले आहे.

- **ग्रंथसंपदा :**

१. Religion and Society among the Coorge of south India –
२. Social Change in Modern India –

३. Remembered Village –
४. Marriage and Family in Mysore –
५. India’s Village –

डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी भारतीय समाजाचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करताना संरचनात्मक प्रकार्यात्मक दृष्टीकोनाचा प्रभावीपणे स्विकार केला होता. संरचनात्मक प्रकार्यात्मक दृष्टीकोनातून त्यांनी जे महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे,ते पुढीलप्रमाणे ....

**१.खेडेगावचा अभ्यास :**

डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी आपले मार्गदर्शक रेडक्लिप ब्राऊन यांच्याकडून भारतातील खेड्यांच्या अभ्यासाची कल्पना घेतली.भारतातील ग्रामीण समाजाचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी **म्हैसूर** जवळील **‘रामपुरा’** या खेड्याची निवड केली.या गावातील सामाजिक व आर्थिक बदल अभ्यासण्यासाठी डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी सुमारे एक वर्ष त्या गावात वास्तव्यास होते.रामपुरा या खेडेगावचा अभ्यास करून समकालीन भारतीय खेड्यांचे विश्लेषण त्यांनी **India’s Village** या ग्रंथात केले आहे.क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीचा पुरस्कार हे त्यांच्या संशोधनाचे वैशिष्ट्य होते.

**‘Remembered Village’** या नावाने त्यांनी केलेला ‘रामपुरा’ खेड्याचा अभ्यास प्रसिध्द आहे.या गावातील सामाजिक संघटनाचा अभ्यास करून **‘प्रभावी जात’ (Dominant Caste)** हि संकल्पना स्पष्ट केली.यामध्ये गावातील लोकांमध्ये स्वजातीबाद्द्ल आत्मीयता अधिक दिसून आली.परस्पर सहकार्य,सामाजिक स्वास्थ्य,जातपंचायतिचे नियंत्रण या महत्वाच्या गोष्टी त्याठिकाणी निदर्शनास आल्या.शेती व्यवसायाशी संबंधित समस्या दिसून आलेल्या होत्या.

**2. प्रभावशाली जात :**

डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी ‘रामपुरा’ खेड्याचा अभ्यास केला व त्या आधारे प्रभावी जात हि संकल्पना स्पष्ट केली आहे.प्रभावशाली जात हे ग्रामीण समाजाचे वैशिष्ट्य आहे.भारतातील ग्रामीण जिवनात ज्या अनेक जाती आहेत त्यापैकी काही जाती ह्या विशिष्ट् क्षेत्रात प्रभावशाली आहेत,सर्व जाती,त्यांची संख्या,त्यांची भूमिका,त्यांचा प्रभाव या बाबतीत समानता दिसून येत नाही.काही जाती अधिक

प्रमाणात संघटीत तर काही जाती विस्कळीत स्वरुपात असतात.ज्या जाती संघटीत आहेत त्या इतर जातींवर आपला प्रभाव किंवा वर्चस्व दाखवत असतात.या संदर्भात डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी 'प्रभावशाली जात' हि संकल्पना स्पष्ट केली आहे.

'जेंव्हा एखादी जात दुसऱ्या जातींपेक्षा संख्येने प्रबळ असते,तसेच जेंव्हा ती दुसऱ्या जातीचा आर्थिक आणि राजकीय सत्तेसाठी वापर करून घेत असते, स्थानिक जातीच्या श्रेणीबद्ध रचनेत धार्मिक जिवनात उच्च स्थान उपभोगते तेंव्हा त्या जातीला प्रभावी जात म्हणतात'.

प्रभावी जात हि संकल्पना पुढील निकषांच्या आधारे डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी स्पष्ट केलेली आहे,

१.मोठ्या प्रमाणावरील जमीन -

२.संख्यात्मक आकार -

३.स्थानिक रचनेत उच्च-कनिष्ठ स्थान -

४.आधुनिक किंवा पाश्च्यात्य शिक्षण आत्मसात असणे -

5.आर्थिक आणि राजकीय सत्तेत मोठा सहभाग -

6.उच्च व्यवसाय -

या निकषांच्या आधारे भारतात आढळणाऱ्या प्रभावी जाती पुढीलप्रमाणे..उदा.महाराष्ट्रात मराठा आणि ब्राम्हण,उत्तर भारतातील राजपूत,गुजरात मधील पटेल etc.संस्कृतीकरण,पश्च्यातीकरण,औद्योगीकरण,शिक्षणप्रसार,सत्तेचे विकेंद्रीकरन होऊन देखिल जातीचे प्रभुत्व व प्रभावी जातीचे महत्व कमी झालेले नाही.राजकीय व आर्थिक सत्ता प्राप्त करणे हि महत्वाकांक्षा प्रभावी जातीची असते.'सत्तेतून संपत्ती व संपत्तीतून सत्ता'हे चक्र निरंतरपणे सुरु ठेवण्याचे प्रमुख सूत्र प्रभावी जातींचे असते असे मत डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी स्पष्ट केलेले आहे,

**3. जातीव्यवस्थेचा अभ्यास -**

भारतीय समाजाचा अभ्यास करत असताना अनेक विचारवंतानी प्रामुख्याने जातिव्यवस्थेच्या व सामाजिक स्तररचनेच्या अभ्यासाला महत्व दिलेले आहे.त्यामध्ये डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी जातिव्यवस्थेच्या अभ्यास कार्यवादी दृष्टीकोनातून करून काही नवीन संकल्पना स्पष्ट केलेल्या आहेत.त्यांच्या मते

ग्रामीण समाजात प्रत्येक जात ही समुदायाच्या स्वास्थ्यासाठीविशिष्ट्य प्रकारचे कार्य करत असते.जातिव्यवस्थेच्या कार्यात्मक बाजूत कितीही बदल झाला तरी जातीमध्ये पूर्णपणे बदल होऊ शकत नाही.जातिव्यवस्थेची चौकट कायम ठेवून समाजात परिवर्तन घडून येत असते.

डॉ.एम.एन.श्रीनिवास यांच्या मते जाती म्हणजे एक खंडात्मक व्यवस्था आहे,प्रत्येक जात हि उपविभागामध्ये विभागलेली असते.यावर आधारीत जातीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे .....

१.एकविवाही घटक -

२.समान व्यवसाय -

३.कर्मकांडात्मक व्यवस्था -

४.समान संस्कृती -

5.जात पंचायत द्वारे नियंत्रण -

6.उच्च-नीचता - व्यावसायिक भिन्नता -

७.आचार - विचारांवर नियंत्रण -

वरील वैशिष्ट्यांवरून आंतरजातीय संबंधाचे स्वरूप स्पष्ट होते व समाजातील त्या -त्या जातीचे स्थान स्पष्ट करतात.

**४.धर्म आणि समाज :**

डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी १९५२ मध्ये कुर्ग या जमातीचा अभ्यास करून Religion and Society among the Coorge of south India हा ग्रंथ प्रकाशित केला.ब्राम्हण लोकांचे आचारविचार,जीवनशैली याचे हिंदुधर्मातील खालच्या जातीचे लोक अनुकरून कसे करतात यावर आधारीत ब्राम्हणीकरण संकल्पना स्पष्ट केली.या प्रक्रियेत ज्यांनी अनुकरून केले त्यांनी आपल्या दर्जात प्रगती साधली आहे व प्रक्रियेत ज्यांनी अनुकरून केले नाही ते तसेच मागास राहिले असे मत श्रीनिवास यांनी स्पष्ट केले आहे. नंतर ब्राम्हणीकरण या ऐवजी त्यांनी संस्कृतीकरण हि संकल्पना वापरली.

**5.सामाजिक परिवर्तन -**

डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी रामपुरा या खेड्याचा अभ्यास केला होता,त्याच खेड्यात नंतर २५ वर्षानंतर ते परत आले व दरम्यानच्या कालावधीत त्या खेड्यात जे परिवर्तन झाले त्यावर आधारित विश्लेषण करणारे Social Change in Modern India हे पुस्तक प्रकाशित केले.सामाजिक परिवर्तन या प्रक्रियेचा सखोलपणे अभ्यास केला.

श्रीनिवास यांच्या मते परिवर्तनाची प्रक्रिया सतत समाजात सुरु असते,समाजाच्या रचनेत बदल करण्याची क्षमता हि संस्कृतीत असते.त्यामुळे सांस्कृतिक परिवर्तनामुळे सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त होते.सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात श्रीनिवास यांनी काही प्रक्रिया स्पष्ट केलेल्या आहेत.त्या पुढीलप्रमाणे ......

**१.ब्राम्हणीकरण :**

डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी ब्राम्हणीकरण हा शब्दप्रयोग केवळ कुर्ग समाजाच्या संदर्भात वापरलेला आहे.कुर्ग समाजातील ब्राह्मण वर्गातील लोकांचे आचार-विचार,पोशाख,आहाराविषयीच्या संकल्पनांचे अनुकरून कनिष्ठ जातीतील लोक आपला सामाजिक दर्जा वाढवण्यासाठी करीत असतात त्यास ब्राम्हणीकरण असे म्हणतात.वरिष्ठ जातीतील रितीरिवाज,परंपरा याचे अनुकरून कनिष्ठ जातीतील लोक पत्येक समाजात करत असतात असे श्रीनिवास यांना अभ्यासातून निदर्शनास आले.सामाजिक परिवर्तनाची एक प्रक्रिया म्हणून ब्राम्हणीकरण हि एक नवीन संकल्पना त्यांनी स्पष्ट केली आहे.

**२. संस्कृतीकरण :**

वरिष्ठ जातीतील रितीरिवाज,परंपरा याचे अनुकरून कनिष्ठ जातीतील लोक पत्येक समाजात करत असतात असे श्रीनिवास यांना अभ्यासातून निदर्शनास आले त्यावेळी त्यांनी ब्राम्हणीकरण ऐवजी संस्कृतीकरण हा शब्द वापरण्यास सुरवात केली. संस्कृतीकरण ही सामाजिक परिवर्तनाची एक प्रक्रिया म्हणून श्रीनिवास यांनी स्पष्ट केली आहे.

'संस्कृतीकरण हि एक अशी प्रक्रिया आहे कि जिच्याद्वारे कनिष्ठ जाती किंवा आदिम जमाती, इतर समूह हे त्यांच्या चालीरीती, धार्मिक विधी, कल्पना,विचार,जीवनमार्ग या गोष्टीत उच्च जातीच्या,ब्राह्मणांच्या प्रमाणे परिवर्तन घडवून आणतात'.

डॉ.एम.एन.श्रीनिवास असे म्हणतात कि,उच्च जातीतील लोकांनी ज्या नवीन सामाजिक मुल्यांचा स्विकार केलेला असतो त्यास समाजात मान्यता व प्रतिष्ठा प्राप्त झालेली असते,अशी भावना कनिष्ठ लोकांची असते.त्यामुळे आपला दर्जा उंचावण्याच्या उद्देशाने कनिष्ठ जातीतील लोक वरच्या जातीतील लोकांचे अनुकरून करत असतात.परंपरा,रीतीरिवाज,संस्कृती याबरोबरच संस्कृतीकरण हि प्रक्रिया राजकीय व आर्थिक सत्तेशी संबंधित आहे.

श्रीनिवास यांच्या मते, संस्कृतीकरण हि प्रक्रिया ब्राम्हणीकरण या प्रक्रियेपेक्षा व्यापक आहे.यामध्ये केवळ ब्राह्मणाचे नव्हे तर आपल्या पेक्षा उच्च जातींचे अनुकरून कनिष्ठ जातीतील लोक करतात.त्याआधारे आपला दर्जा,जीवनमान उंचावत असतात.त्यामुळेच सामाजिक परिवर्तनाची महत्वाची प्रक्रिया म्हणून संस्कृतीकरण प्रक्रियेकडे पहिले जाते.